ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

ENGLISH / MARATHI PART - I

## Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांच्या ई-बँकिंग सुविधांचा अभ्यास (विशेष संदर्भ : नांदेड व औरंगाबाद जिल्हा)<br>**प्रा. कांबळे नागनाथ विठ्ठलराव** | १-५ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार<br>**डॉ. आर. पी. पाटील**<br>**श्री. देवरे जनार्दन जानजी** | ६-९ |
| ३ | वसंत आबाजी डहाकेंची कविता : प्रेरणा स्वरूप व वेगळेपण<br>**प्रा. डॉ. सुधीर भगत**<br>**कु. ज्योत्स्ना प्रभाकर राउत** | १०-१४ |
| ४ | भारतीय वृत्तपत्राचा उदय, विकास आणि स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका<br>**डॉ. प्रगती बी. मारकवार** | १५-१८ |
| ५ | पारध्याची गाय : मूलतत्त्ववादाची घातकी रूपे असणारा कथासंग्रह<br>**प्रा. जगदीश रघुनाथ भैसारे** | १९-२३ |
| ६ | ग्रामीण समाजवास्तव आणि नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबऱ्या<br>**डॉ. अशोक भक्ते** | २४-३० |
| ७ | संत बहिणाबाईंच्या काव्यातील सामाजिक जाणिवांचा शोध<br>**डॉ. हनुमंत मारोतीराव भोपाळे** | ३१-३४ |
| ८ | १९९० नंतर कादंबरी वाङमय प्रकारात स्त्री लेखिकांचे योगदान<br>**डॉ. दिलीप काकडे** | ३५-३८ |
| ९ | मराठी कथेची पायाभरणी नवकथेने केली<br>**डॉ. जयदेवी पवार** | ३९-४२ |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्षामार्फत (अस्पृश्य) दलितोद्धाराचे कार्य<br>**प्रा. डॉ. आर. बी. पंडित** | ४३-४७ |
| ११ | सोशल मीडिया आणि वाचक<br>**डॉ. घ. ना. पांचाळ** | ४८-५२ |

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २३ | भारतीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाचन अभिरूची : एक अभ्यास<br>**प्रा. अरविंद संभाजी पाझारे** | ११९-१ |
| २४ | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण<br>**डॉ. सूर्यकांत माधवराव सांभाळकर** | १२५-१ |
| २५ | दलित - आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेतील 'आई'<br>**प्रा. डॉ. अजय चिकाटे** | १२९-१ |

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २३. भारतीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाचन अभिरूची : एक अभ्यास

**प्रा. अरविंद संभाजी पाझारे**
ग्रंथपाल, भारतीय महाविद्यालय, मोर्शी.

**सारांश**

मानवी विकासातील अत्यंत महत्वाची पायरी म्हणजे वाचन. वाचनाशिवाय यशाची फळे चाखणे किंवा शिडी चढणे शक्यच नाही. त्यामूळे भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील ग्रंथालयात येणारे विद्यार्थी काय वाचतात, किती वेळ वाचतात, वाचन साहित्य निवडताना कश्याचा उपयोग करतात, कशी मदत घेतात याचा अभ्यास करून भविष्यात ग्रंथालयीन सेवा देणे सुकर व्हावे या अनूषंगाने सदर पेपरमध्ये 2016–2017 व 2017–2018 अश्या दोन सत्रातील विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीव्दारे माहिती गोळा करून विश्लेषण करण्यात आले आहे.

**शोधसंज्ञा** : वाचन, वाचन अभिरूची

## प्रस्तावना

21 वे शतक हे माहिती, विज्ञान व तंत्रज्ञानाचे शतक आहे. विज्ञानाच्या या प्रगतीमुळे संपुर्ण जग हे एक शहर म्हणून झालेले आहे. दुरसंचारक्रांतीमुळे माहितीची देवाण घेवाण प्रचंड गतीने होत आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमे काहीही विशेष श्रम न करता बसल्या जागी माहितीचा खजिना उघडून देत आहेत. अशा या वातावरणात ग्रंथ वाचनाची आवड कमी होईल की काय अशी भीती वर्तविली जात आहे. वाचन ही सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रारंभिक अवस्था आहे. वाचनाशिवाय शिकणे शक्य नाही. जसे शरीराच्या वाढीसाठी अन्न आवश्यक आहे तसेच मेंदूसाठी वाचन प्रक्रिया अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तिमत्व विकास प्राप्त करण्यासाठी एखाद्याने पुस्तके आणि इतर वाचनसाहित्य वाचले पाहिजे. वाचल्याशिवाय आपल्या आजूबाजूला आणि जगात काय घडत आहे हे जाणून घेणे कठीण आहे. वाचनाची प्रकिया केवळ संज्ञानात्मक विकासच नव्हे तर ज्ञान वाढविते. जर आपण वृत्तपत्रातील कोणतीही बातमी वाचली तर आपण आपल्या सहका–यांसह, मित्रांशी चर्चा करतो आणि कुटुंब हे आपल्याला आपले विचार व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ देते. वृत्तपत्र देश आणि सध्याच्या घडामोडींचा प्रसार करण्यासाठी नेहमीच महत्वाची भूमिका बजावली आहे. वृत्तपत्र हा आपल्या आजच्या आधुनिक जीवनाचा देखिल एक आवश्यक भाग आहे. ते जगभरातील प्रत्येक भाषेत मुद्रित आणि प्रकाशित केले जातात. वाचक हे समाजाचा आरसा म्हणून ओळखले जातात. वाचनाने व्यक्तीचे ज्ञान वाढते सोबतच शब्दसामर्थ्य व भाषिक कौशल्य वाढण्यास मदत होते.

प्रस्तावित लेखात केवळ भारतीय महाविद्यालयाला रूजू झाल्यानंतर विविध नविन उपक्रम व नवनविन सेवा देण्यात येवू लागल्या पण त्याचा उपयोग विद्यार्थी किती घेतात यासंदर्भात उपलब्ध माहीती नसल्यामुळे या माध्यमातून विद्यार्थ्यी कितपत ग्रंथालयाचा वापर करीतात याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याकरिता 2016 – 2017 व 2017 – 2018 अश्या दोन वर्षाच्या सत्रातील विद्यार्थी घेण्यात आलेले आहे.

## उद्देश

1. विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय भेटीच्या उद्देशाचे परीक्षण करणे.
2. विद्यार्थी आधुनिक वाचन साहित्याचा शोध कशाप्रकारे घेतात. हे तपासणे.

3. विद्यार्थी कशाप्रकारे आपली वाचनाची आवड पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात याविषयी अभ्यास करणे.
4. ग्रंथालयीन स्त्रोत वापरतांना विद्यार्थ्यांना येणा–या अडचणी ओळखणे.
5. ग्रंथालय सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांकडून सूचना प्राप्त करणे.
6. ग्रंथालयाद्वारे विद्यार्थ्यांच्या वाचन विषयक संपूर्ण गरजांची पूर्तता होते काय याचा अभ्यास करणे.

**व्याप्ती**

सदर लेखाकरीता भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि. अमरावती येथील सत्र 2016 – 2017 व 2017 – 2018 या शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांची ग्रंथालयीन वापर व त्यांच्या वाचन सवयींचा अभ्यास करणे यावर मर्यादित आहे.

**संशोधन पध्दत**

सदर संशोधनाकरिता विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करून ती माहिती संगणकाच्या एक्सेल शिटवर टाईप करून त्या माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक पध्दतीने करण्यात आले आहे.

**महितीचे विश्लेषण व सादरीकरण**

**तक्ता क्र. 1 विद्यार्थ्यांचे प्रश्नावली प्रतिसाद**

| अ.क्र. | शाखा | एकूण वाटप प्रश्नावली | | प्रतिसाद | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 16–17 | 17–18 | 16–17 | 17–18 | | |
| 1: | कला | 35 | 45 | 32 | 40 | 91.42 | 88.88 |
| 2. | वाणिज्य | 12 | 14 | 12 | 14 | 100.00 | 100.00 |
| 3. | पदव्युत्तर (एम.ए. एम.कॉम.) | 10 | 12 | 08 | 11 | 80.00 | 91.66 |
| | एकूण | 57 | 71 | 52 | 65 | 91.22 | 91.54 |

वरील तक्त्यावरून शैक्षणिक सत्र 2016–2017 मध्ये 91.22 टक्के विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला तर शैक्षणिक सत्र 2017–2018 मध्ये 91.54 टक्के विद्यार्थ्यांनी प्रश्नावली भरून प्रतिसाद दिला. वाणिज्य पदवी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद दोनही वर्षाला 100 टक्के आढळून आला.

**तक्ता क्र. 2 विद्यार्थ्यांचे वर्गनिहाय विवरण**


| अ.क्र. | वर्ग | 2016–17 (टक्के) | | 2017–18 (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बि. ए. भाग 1 | 17 | (32.70) | 20 | (30.77) |
| 2. | बि. ए. भाग 2 | 11 | (21.15) | 14 | (21.54) |
| 3. | बि. ए. भाग 3 | 04 | (07.70) | 06 | (09.23) |
| 4. | बि. कॉम. भाग 1 | 03 | (05.77) | 03 | (04.62) |
| 5. | बि. कॉम. भाग 2 | 06 | (11.53) | 06 | (09.23) |
| 6. | बि. कॉम. भाग 3 | 03 | (05.77) | 05 | (07.69) |
| 7. | एम. ए. | 07 | (13.46) | 06 | (09.23) |
| 8. | एम. कॉम. | 01 | (01.92) | 05 | (07.69) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |

वरील तक्त्यावरून महाविद्यालयात उपलब्ध सर्व विद्यार्थ्यांना वर्गनिहाय प्रश्नावली वाटप करून परत आलेल्या प्रश्नावलीचे वर्गनिहाय विश्लेषण करण्यात आलेले दिसून येते.

**तक्ता क्र. 3 विद्यार्थ्यांचे लिंगनिहाय विश्लेषण**

| अ.क. | लिंग | 2016–17 (टक्के) | | 2017–2018 (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुले | 21 | (40.39) | 29 | (44.62) |
| 2 | मुली | 31 | (59.52) | 36 | (55.38) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |

**आलेख क्र. 1 : विद्यार्थ्यांचे लिंगनिहाय विश्लेषण**




वरील तक्ता व आलेखावरून सत्र 2016–2017 व 2017–2018 मध्ये मुलांचा प्रतिसादापेक्षा मुलींचा प्रतिसाद जास्त म्हणजे 59.52 टक्के व 55.38 टक्के आढळून आला.

**तक्ता क्र. 4 ग्रंथालय भेट विश्लेषण**

| अ.क. | विवरण | 2016–17 (टक्के) | | 2017–18(टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दररोज | 38 | (73.07) | 54 | (83.07) |
| 2 | आठवडयातून एकदा | 00 | (00.00) | 00 | (00.00) |
| 3 | आठवडयातून दोनदा | 12 | (23.07) | 11 | (16.93) |
| 4 | महिन्यातून एकदा | 02 | (03.86) | 00 | (00.00) |
| 5 | कधीच नाही | 00 | (00.00) | 00 | (00.00) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |

वरील तक्त्यावरून सत्र 2016–17 मध्ये दररोज 73.07 टक्के विद्यार्थी दररोज ग्रंथालयाला भेट देतात. तसेच आठवडयातून दोनदा भेट देणारे विद्यार्थी 23.07 टक्के आहे. तर 2017–18 मध्ये दररोज 83.07 टक्के विद्यार्थी दररोज ग्रंथालयाला भेट देतात. तसेच आठवडयातून दोनदा भेट देणारे विद्यार्थी 16.93 टक्के आहे.

**तक्ता क्र. 5 ग्रंथालय भेटीचा वेळ विश्लेषण**

| अ.क. | विवरण | 2016–17 (टक्के) | | 2017–18 (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मध्य विश्रांतीमध्ये | 11 | (21.15) | 16 | (24.62) |
| 2 | तासिका नसतांना | 24 | (46.15) | 30 | (46.15) |
| 3 | महाविद्यालयीन वेळा अगोदर | 15 | (28.84) | 07 | (10.77) |
| 4 | महाविद्यालयीन वेळा नंतर | 02 | (03.86) | 12 | (18.46) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |

वरील माहितीच्या आधारे दोनही सत्रातील विद्यार्थी हे तासिका नसताना ग्रंथालयात जातात.

**तक्ता क्र. 6 ग्रंथालय भेटीचा उद्देश विश्लेषण**


| अ.क्र. | विवरण | 2016–17 (टक्के) | | 2017–18 (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पैसे जमा करून पुस्तके घेण्याकरिता | 00 | (00.00) | 00 | (00.00) |
| 2 | संबंधीत नियतकालिके वाचण्याकरिता | 11 | (21.15) | 12 | (18.46) |
| 3 | वृत्तपत्र वाचण्याकरिता | 12 | (23.08) | 07 | (10.77) |
| 4 | इंटरनेट ब्राउजींग करीता | 05 | (09.62) | 12 | (18.46) |
| 5 | पुस्तके देवाण घेवाण करण्याकरिता | 24 | (46.15) | 34 | (52.31) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |

विद्यार्थी ग्रंथालयात विविध उद्देश ठेवून ग्रंथालयात येत असतात. दोनही सत्रातील जास्तित जास्त विद्यार्थी हे पुस्तके देवाण घेवाण करण्याकरिता म्हणजे 46.15 टक्के व 52.31 टक्के विद्यार्थी येतात.

**तक्ता क्र. 7 माहिती शोध विश्लेषण**

| अ.क्र. | विवरण | 2016–17 (टक्के) | | 2017–18 (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कर्मचारी यांची मदत | 23 | (44.23) | 33 | (50.77) |
| 2 | कपाटामधून | 02 | (03.84) | 03 | (04.61) |
| 3 | अभ्यासक्रम पुस्तिका बघून | 22 | (42.31) | 25 | (38.47) |
| 4 | इतर | 05 | (09.62) | 04 | (06.15) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |

**आलेख क्र. 2 माहिती शोध विश्लेषण**





वरील आलेख व तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, ग्रंथाचा शोध घेताना विद्यार्थी कर्मचारी व अभ्यास पुस्तिका पाहून ग्रंथ शोध घेत असल्याचे आढळून येते.

**तक्ता क्र. 8 ग्रंथालयीन साधनांचा वापर विश्लेषण**

| अ.क्र. | विवरण | 2016–17 (टक्के) | | 2017–18 (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ग्रंथ | 34 | (65.39) | 36 | (55.39) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | नियतकालिके | 10 | (19.23) | 17 | (26.15) |
| 3 | संदर्भग्रंथ | 08 | (15.38) | 12 | (18.46) |
| 4 | सिडी / डिव्हीडी | 00 | (00.00) | 00 | (00.00) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |




वरील तक्ता व आलेखावरून असे दिसून येते की, सत्र 2016–2017 मधील विद्यार्थी जास्तित जास्त 65.39 ंथ वापरताना दिसतात. तर सत्र 2017–2018 मध्ये 55.39 टक्के विद्यार्थी ग्रंथ वापरतात. सिडी व डिव्हीडी वापर नाही असे आढळून येतात.

**तक्ता क्र. 9 ग्रंथालयात घालविलेल्या वेळेचे विश्लेषण**

| अ.क्र. | विवरण | 2016–17 (टक्के) | | 2017–18 (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 ते 15 मिनिट | 02 | (03.85) | 01 | (01.54) |
| 2 | 1/2 तास | 10 | (19.23) | 10 | (15.38) |
| 3 | 1 तास | 19 | (36.54) | 23 | (35.38) |
| 4 | 1 तासापेक्षा जास्त | 21 | (40.38) | 31 | (47.70) |
| | एकूण | 52 | (100.00) | 65 | (100.00) |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, एक तासापेक्षा जास्त वेळ ग्रंथालयात घालविलेल्यांचे प्रमाण 40.38 47.70 टक्के आहे.

सदर संशोधन करण्याकरीता शैक्षणिक सत्र 2016–2017 व 2017–2018 या दोन शैक्षणिक सत्रातील अभ्यासाकरीता घेण्यात आले. त्यामध्ये माहितीचे विश्लेषण केल्यानंतर खालिल निष्कर्श आढळून आले.

संशोधनाला मुलांपेक्षा मुलींचा प्रतिसाद जास्त आढळून आले.

वाणिज्य विद्यार्थ्यांची संख्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांपेक्षा मोजकी असल्यामूळे त्यांचा प्रतिसाद 100 टक्के आढळून आला.

ग्रंथालयात दररोज येणा–या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे.

तासिका नसताना जास्तित जास्त विद्यार्थी ग्रंथालयाला भेट देतात.

पुस्तकांची देवाण घेवाण करण्याचा उद्देश ठेवून जास्तित जास्त विद्यार्थी ग्रंथालयात येतात.

6. विद्यार्थी माहीतीचा शोध घेताना ग्रंथालयीन कर्मचा–यांची मदत घेतात. सोबतच अभ्यासकम पुस्तिका वापरून शोध घेतात.
7. विद्यार्थी एका तासापेक्षा जास्त वेळ ग्रंथालयात घालवितात.

**संदर्भ सूची**


1. अघाव, उध्दव.(2012),ग्रंथायन, परभणी, न्यु मॅन पब्लिकेशन, पृ. क. 7
2. आठल्ये, श्रिनिवास मे. (2014) दिवस व रात्र महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या वाचनविषयक सवयींचा तौलनिक अभ्यास, ज्ञानगंगोत्री, जून – नोव्हे.(1 व 2) पृ. क. 81.
3. कर्णिक, प्रदीप (2010) ग्रंथपुण्यसंपत्ती, मुंबई, नवचैतन्य प्रकाशन, पृ. क. 154.
4. तैत्रव 165.
5. गोखले, हेमंत (2006) व्यक्तिमत्व विकासाच सोपे मार्ग लातूर, विद्याभारती प्रकाशन, पृ. क. 88.
6. जैन, प्रकाश व हेडाउ, मुरलीधर, वाचन संस्कृती वाढविण्याची गरज. माहितीयुग, जानेवारी 2012.
7. देशपांडे, दत्तात्रय (2012), महाविद्यालयीन ग्रंथालय आणि माहिती तंत्रज्ञान, माहिती युग 5(1–2) पृ. क. 13.
8. पाझारे, अरविंद भारतीयांच्या वाचनसंस्कृतीचे उर्जास्त्रोत : दीक्षाभूमी , दीक्षाभुमी गौरव ग्रंथ, खंड 2, नागपूर, बहुजन साहित्य प्रसार केंद्र,
9. पाझारे, अरविंद व चंदनकर, भिमराव, युवक वाचतील तर देष वाचेल, ज्ञानजगत, आक्टो.–डिसे. 2012.
10. लोकराज्य वाचन विषेषांक जून–जुलै 2011.
11. हाजन, शां. ग. (2013) विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयाचे व्यवस्थापन,पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन, पृ. क. 15.